# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास.

**राणी महादेव कांबळे.** सहाय्यक प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग, म्हैसाळ महाविद्यालय ,म्हैसाळ मो.नं. 9762407576

ई मेल आयडी :- ranukamble85@gmail.com.

---

**गोषवारा :-**

डॉ.आंबेडकर यांचे व्यक्तिमत्व अनेक पैलूंनी युक्त असले तरी त्यामधे एक समान धागा होता आणि तो म्हणजे समाजाचा आर्थिक विकास होय. डॉ. आबेडकरांचा जाती व्यवस्थेवरील हल्ला हा हे केवळ उच्चवर्णीयांच्या वर्चस्ववादाला दिलेले आव्हान नसून आर्थिक विकासाशी त्यांच्या मांडणीचा जवळचा संबंध होता , जातीव्यवस्थेमुळे श्रमाची आणि भांडवलाचे गतिशीलता कमी झाली असून, त्याचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर आणि विकासावर प्रतिकूल परिणाम झाला आहे असे त्यांचे ठाम प्रतिपादन होते. भारतातील औद्योगिक संबंधाची पायाभरणी करण्याचे काम डॉ.. आबेडकरांनी केले. त्यांनी पाटबंधारे उर्जा आणि इतर सार्वजनिक बांधकामे खातेही सांभाळली. देशाचे पाटबंधारे धोरण निश्चित करण्यात त्यांनी महत्वाची भूमिका पार पाडली. दामोदर व्हॅली प्रकल्प हे त्याचेच एक उत्तम उदाहरण होय. आंबेडकरांनी कृषी, जलसिंचन,सहकार शेती, याबरोबरच अर्थशास्त्र वित्त व्यवस्था आणि चलनव्यवस्था याविषयी आपल्या आर्थिक विचारात मांडणी केलेली आहे.

**प्रस्तावना :-**

भारतीय समाजामध्ये अनेक विचारवंतानी आपले आर्थिक विचार मांडून भारतीय अर्थव्यवस्थेचे चित्र समाजापुढे मांडण्याचे कार्य केले. त्यामध्ये स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये दादाभाई नौरोजी, न्या. रानडे, न्या. गोखले ,राजाराम मोहन राय इत्यादींचा समावेश होतो. परंतु स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये आर्थिक विचारांचा अभ्यास करून भारतीय समाजात न्याय संगत अर्थव्यवस्था स्थापित करण्याचे काम भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. आंबेडकरांना भारतामध्ये न्याय सांगत अर्थव्यवस्था प्रस्थापित करायची होती आणि गरिबी बेरोजगारी कमी करून भारतामध्ये समता प्रस्थापित करायची होती. यासाठी त्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेचा अभ्यास करून विचार मांडले. त्यांच्या आर्थिक विचारात त्यांनी कृषी, औद्योगिक ,जलसिंचन, सहकार शेती या सर्व बाजूंना स्पर्श केल्याचे दिसते.

महत्त्वाचे शब्द :- कृषी, सहकारी शेती, महिला विकास, औद्योगिकीकरण.

**उद्दिष्टे :-**

1. डॉ. आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करणे.
2. डॉ.आंबेडकरांच्या कृषी उद्योग आणि व्यापारविषयक विचारांचा अभ्यास करणे.
3. डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचा समाज जीवनावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

**विषयाची निवड :-**

आंबेडकरांच्या कार्याचे विविध अंगाने संशोधन झालेले आहे परंतु त्यांच्या आर्थिक विकास सावर फार अल्प प्रमाणात प्रकाश पडलेला आहे. त्यांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास झाल्यास एकूण संशोधक , संशोधक विद्यार्थी शिक्षक आणि समाजास उपयोगी पडेल.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोध निबंधासाठी पुस्तके, लेख,वृत्तपत्रे,इंटरनेट इत्यादी संदर्भ साधनांचा उपयोग करण्यात आला आहे.

**आंबेडकरांचा परिचय :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय अर्थशास्त्रज्ञ,न्यायशास्त्रज्ञ,राजकारणी तत्वज्ञ आणि समाजसुधारक होते. त्यांनी सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभा केली तसेच महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले ते ब्रिटिश भारताचे मजूर मंत्री ,स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार होते .त्यांनी देशाच्या विविध क्षेत्रात दिलेल्या योगदानामुळे त्यांना आधुनिक भारताचे निर्माते असेही म्हणतात. आंबेडकर यांनी कोलंबिया विद्यापीठ आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या शिक्षण संस्थांमधून अर्थशास्त्र विषयात पीएचडी पदवी मिळवली अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र या विषयावर त्यांनी संशोधन केले तसेच त्यांनी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातही काम केली ते भारताच्या स्वातंत्र्यासाठी प्रचारांमध्ये व चर्चांमध्ये सामील झाले त्यासाठी त्यांनी वृत्तपत्रे प्रकाशित केली दलितांसाठी राजकीय हक्कांचा व सामाजिक स्वातंत्र्याचा पुरस्कार केला त्याचबरोबर आधुनिक भारताच्या निर्मितीमध्ये त्यांचे मोलाचे योगदान होते. सन 1956 मध्ये त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला त्यानंतर काही महिन्यांनी त्यांचे निधन झाले सन 1990 मध्ये त्यांना मरणोत्तर भारतरत्न हा भारताचा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान करण्यात आला .

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार :-**

डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक विचारांमध्ये खालील घटकांचा समावेश होतो.

**1. कृषी:-**

डॉ.आंबेडकर यांनी भारतातील ग्रामीण अर्थव्यवस्थेचाही अभ्यास केला होता त्यांनी शेती व शेतकरी यांच्या बद्दल मूलभूत चिंतन केले आहे शेती व्यवसायाचा संबंध त्यांनी समाज व्यवस्थेशी जोडला होता शेती केवळ उदरनिर्वाहाचे साधन नाही तर तो देशाचा राष्ट्रीय व्यवसाय आहे ते राष्ट्राचे उत्पन्नाचे साधन आहे शेतीचे उत्पन्न उत्पादकता वाढली तर देश आर्थिक दृष्ट्या सक्षमपणे त्यासाठी बाबासाहेबांनी शेतीवरचा बोजा कमी करावा शेतीमध्ये एकच मूल ठेवावे आणि इतरांना इतर क्षेत्रात पाठवावे असे उपाय शेती विकासाच्या दृष्टिकोनातून सुचवले शेतकऱ्यांना शेती विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी ठोस उपक्रम राबविले.

**2. सामुदायिक शेती :-**

भारतीय शेती आणि शेतकऱ्यांपुढे मोठी आर्थिक समस्या होती ती म्हणजे भांडवलांची अपुऱ्या भांडवलामुळे शेतकऱ्यांपुढे अनेक समस्या निर्माण होतात भांडवला अभावी शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढतो सावकारी पाशामध्ये ते अडकतात या समस्येवर उपाय म्हणून आंबेडकरांनी सामुदायिक शेतीची संकल्पना मांडली होती सामुदायिक शेतीमुळे अल्पभूधारक शेतमजूर, आदिवासी, अस्पृश्यवर्ग यांना त्यामध्ये सामावून घेतले त्यामुळे जमीनदार आणि मजूर हा भेदभाव नष्ट झाला.

**3. विद्युत आणि जलधोरण :-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर जावई श्रम सिंचन आणि विद्युत धोरण समितीचे अध्यक्ष होते तेव्हा त्यांनी जलसंपत्तीच्या विकासासाठी ठळक भूमिका पार पाडली होती त्यांच्या मते अतिरिक्त पाणी हे कधीच हानिकारक ठरू शकत नाही अतिरिक्त पाण्याच्या म्हणजेच महापूर समस्येवर उपाय म्हणजे पाण्याचे जतन व संवर्धन करणे आवश्यक होती त्यासाठी पाण्याचा अनेक प्रकारे वापर करणे गरजेचे होते उदाहरणार्थ धरणे बांधून जलसिंचन वाढविणे विजय निर्मिती इत्यादी यासाठी आंबेडकरांनी दामोदर प्रकल्प महानदी सून तसेच इतर आंतरराज्य नद्यांवर बहुउद्देशीय प्रकल्प राबवण्यासाठी प्रयत्न केले आणि त्याचबरोबर त्यांनी जलधोरण आणि विद्युत प्रकल्पांसाठी सार्वजनिक हित लक्षात घेऊन घटनात्मक तरतुदी केल्या आहेत.

4. **सहकारी शेती**:-

भारतीय अर्थव्यवस्था मागास राहण्याचे कारण ग्रामीण व्यवस्थेची निगडित असलेली जमीन करण्याची पद्धत ही पद्धत वर्षानुवर्षी चालत आली होती त्यामध्ये काळाप्रमाणे बदल करण्यात आला नव्हता यामुळेच शेतीची समस्या सोडवण्यासाठी आंबेडकरांनी सहकारी शेतीचा पुरस्कार केला होता.

**5. उद्योग व्यापार:-**

आंबेडकरांच्या मते उद्योग व्यापाराचा विकास होणे आवश्यक आहे शेतीबरोबर शेतीमालावर प्रक्रिया करणारे उद्योग वाढवल्यास शेतकऱ्यांचे आर्थिक प्रश्न सुटतील व अर्थव्यवस्था बळकट होण्यास मदत होईल.

**6) औद्योगिकीकरण :-**

भारताचा आर्थिक विकासा औद्योगिकरणाशिवाय अशक्य आहे असा विचार आंबेडकरांनी मांडला होता त्यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात रोजगार वाढला तर वस्तूंचे उत्पादन वाढून त्यांचा मोठ्या प्रमाणात खूप वाढतो कच्चामाल आणि कामगारांची मागणी वाढते परदेशी भांडवलावर अवलंबून राहावे लागणार नाही या सर्व कारणांमुळे जलद विकास होण्यास मदत होते.

**7. चलनविषयक:-**

आंबेडकरांनी सन 1923 मध्ये द प्रॉब्लेम ऑफ रुपी इट्स ओरिजिन अँड सोल्युशन या ग्रंथांमध्ये भारतीय रुपयाच्या उत्क्रांतीचे ऐतिहासिक मी मीमांसा सादर केली त्यामध्ये त्यांनी भारतासाठी आदर्श चलन पद्धती कोणती या विषयावर विचार मांडले आहेत त्यांनी त्यांच्या प्रॉब्लेम ऑफ द रुपी या पुस्तकात रुपयाच्या अवमूल्यनावर त्यांचे विचार मांडले आहेत भारताचे चलन हे सोन्यात असावे असा अर्थतज्ञ लॉर्ड केन्स यांनी मांडलेले मत हे आंबेडकरांनी त्याचा विरोध करून त्या ऐवजी सुवर्ण विनिमय परिमाण अमलात आणावे अशी शिफारस केली त्या संदर्भात सन १९२५ मध्ये स्थापन केलेल्या हिल्टन यंग आयोगा पुढे आंबेडकरांनी साक्षही दिली त्यानंतर एक सन 1935 झाली आंबेडकरांच्या पुढाकारानेच भारतीय रिझर्व बँकेची स्थापना करण्यात आली भारताच्या मूलभूत आर्थिक विचारांचा पाया आंबेडकरांच्या आर्थिक विचारांवरच घातला गेला आहे.

8. **महिला विकास:-** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आर्थिक विकासामध्ये महिलांच्या योगदानाला महत्त्वपूर्ण स्थान दिले आहे त्यांनी संविधानामध्ये महिलांना स्वतंत्र अधिकार मिळवून दिले आहेत त्यांच्या मते महिलांना आर्थिक स्वातंत्र्यापासून वंचित ठेवले तर देशाच्या आर्थिक विकासाला मर्यादा पडतील म्हणून आंबेडकरांनी महिलांसाठी आर्थिक अधिकार आर्थिक संरक्षण व मजुरी संबंधित कायद्यात तरतुदी केल्या आहेत. खऱ्या अर्थाने आंबेडकर हे महिलांचे उद्धारक होते.

**डॉ. आंबेडकरांचे अर्थशास्त्रीय लेखन:-**

1. ईस्ट इंडिया - प्रशासन आणि अर्थनिती (१९१५)
2. ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती (1916)
3. रुपयाचा प्रश्न- उद्गम आणि उपाय (1922)
4. स्मॉल होल्डिंग इन इंडिया अँड देयर रेडीमीज (1918)
5. वृत्तपत्रीय लिखाण – मूकनायक,बहिष्कृत भारत,जनता,प्रबुद्ध भारत.

**निष्कर्ष :-**

1) कृषी उत्पन्न वाढल्यास राष्ट्रीय उत्पन्न ही वाढेल आणि देशाचा आर्थिक विकास होईल असे डॉ. आंबेडकरणा वाटत होते.
2) अपुऱ्या भांडवलाअभावी भारतात सामुदायिक शेती जास्त उपयोगी ठरेल.
3) उद्योगधंद्यांच्या विकासामुळे रोजगार निर्मिती होऊन बेरोजगारी कमी होईल आणि देशाचा आर्थिक विकास घडून येईल.
4) आर्थिक विकासामध्ये महिलांच्या योगदानामुळे देशाचा आर्थिक विकास होऊन महिला सक्षमीकरण घडून येईल.

**संदर्भ:-**

1. https:IImr. wikipedia.org
2. गाठाळ एस.एस., आंबेडकर चळवळीचा इतिहास ,कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद पृष्ठ क्रमांक 247 ते २५१
3. गाठाळ एस. एस ,आंबेडकर चळवळीचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद पृष्ठ क्रमांक 250
4. Journal for all subjects : www.ibp.world volume – 8.1 ISSUE – 3 December -2018
5. www.tarunbharat.com. April 14-2021
6. www.tarunbharat.com. April 14-2021
7. www.esakal.com April 14 .2022
8. https://en wikipedia.org >wiki
9. www.ibp.world
10. गाठाळ एस. एस, आंबेडकरी चळवळीचा इतिहास कैलाश पब्लिकेशन औरंगाबाद पृष्ठ क्रमांक 288 ते 392